# चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील बी.पी.एड अभ्यासक्रमातील उच्चक्रमवारी घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी शिक्षकांचा सद्यस्थितीचा सर्वेक्षणात्मक अभ्यास

**अक्षय देवेंद्र जामकर**
संशोधक विद्यार्थी , चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय

**डॉ. शरद आहेर**
प्राध्यापक, चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय

## गोषवारा

*प्रस्तुत संशोधनात संशोधकाने चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील बी.पी.एड अभ्यासक्रमातील उच्चक्रमवारी घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी शिक्षकांचा सद्यस्थितीचा सर्वे क्षणात्मक अभ्यासा संबंधित असल्याने सदर उदिष्टे ठरविले आहे. यासाठी संशोधकाने चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील बी.पी.एड मधील सन १९७७ ते २०१५ चे फक्त प्रथम द्वितीय व तृतीय क्रमवारीमध्ये उत्तीर्ण झालेले एकूण १४४ विद्यार्थी शिक्षकांची न्यादर्श म्हणून सहेतुक पद्धतीने निवड केली आहे. सदर संशोधनात प्रश्नावली या साधनाचा वापर केला आहे. चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांची सद्य: स्थिती तपासण्यासाठी प्रश्नावली चा वापर केला आहे. प्रश्नावली तयार करून ती चार तज्ज्ञ व्यक्तींकडून तपासून घेतली. सदर संशोधनात चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील बी.पी.एड अभ्यासक्रमातील उच्चक्रमवारी घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी शिक्षकांचा सद्य:स्थितीमध्ये त्यांचे कार्यक्षेत्र जाणून घेतले. तसेच प्राप्त केलेल्या पदवी विषयी माहिती जाणून घेतली. किती वर्षपासून या क्षेत्रात कार्यरत आहात हे जाणून घेतले. विद्यार्थी शिक्षक त्यांच्या क्षेत्रात कार्य करत असतांना कोण–कोणते उपक्रम राबविले याची माहिती जाणून घेतली. विद्यार्थी शिक्षक त्यांच्या कार्यक्षेत्रात कोणते पद भूषवित आहे हे जाणून घेतले. विद्यार्थी शिक्षक त्यांच्या क्षेत्रात काम करत असताना त्यांना कोणत्या अडचणीना सामोरे जावे लागले हे जाणून घेतले. तसेच त्या अडचणीतून बाहेर निघण्यासाठी विद्यार्थी शिक्षक*

*काय व कोणते प्रयत्न करतात हे जाणून घेतले. विद्यार्थी शिक्षकांनी त्यांच्या क्षेत्रात काम करत असतांना कोण–कोणते यश प्राप्त केले याची माहिती जाणून घेतली. शेवटी विद्यार्थी शिक्षकांचे त्यांच्या क्षेत्राबद्दल चे समाधानाविषयी माहिती जाणून घेतली. यावरून असा निष्कर्ष निघाला की चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील बी.पी.एड अभ्यासक्रमातील उच्चक्रमवारी घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी शिक्षकांची सद्यस्थिती ही चांगली व समाधानकारक आहे व शरीरिक शिक्षणाचा दर्जा त्यांनी उंचावला आहे.*

***महत्वाच्या संज्ञा :*** बी.पी.एड, उत्तीर्ण, सद्यस्थिती, अभ्यासक्रम, उच्चक्रमवारी

## प्रस्तावना

चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय' हे भारत देशातील महाराष्ट्र राज्यामध्ये पुणे येथील गुलटेकडी येथे स्थित एक भारतीय स्वायत्त संशोधन महाविद्यालय आहे. हे महाविद्यालय 'सावित्रीबाई फुले' पुणे, विद्यापीठाशी संलग्नित आहे. या महाविद्यालयामध्ये दोन पदवी अभ्यासक्रम चालतात. त्यातील एक म्हणजे बी.पी.एड व दुसरे म्हणजे एम.पी.एड.

सुरवातीला बी.पी.एड अभ्यासक्रमापासून सुरवात झाली. अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी बी.पी.एड्. ची पदवी घेऊन बाहेर पडले व शारीरिक शिक्षण क्षेत्रामध्ये त्यांनी आपल्या कामाला सुरुवात केली व आत्ताही ते शारीरिक शिक्षण क्षेत्रात काम करत आहेत. असे अनेक विद्यार्थी महाविद्यातयामध्ये उत्तीर्ण होवून या क्षेत्रात चांगले काम करत आहेत. शाळा असो वा महाविद्यालय प्रत्येक विद्यार्थ्याला परीक्षा ही द्यावीच लागते व परीक्षेला सामोरे जावेच लागते. आणि त्या परीक्षेच्या माध्यमातून आपल्याला विदध्यार्थ्यामधील गुणवत्ता कळते. दरवर्षी परीक्षेचा निकाल लागला की आपल्याला प्रथम, द्वितीय, व तृतीय क्रमवारीमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांची माहिती कळते.

अशा या महाविद्यालयामध्ये बी.पी.एड. हा अभ्यासक्रम २०१५ पर्यंत एक वर्षाचा होता. त्यानंतर तो दोन वर्षांचा झाला. काळानुसार अभ्यासक्रमात बदल होत गेले. तात्विक भाग (१०८०१९), प्रात्यक्षिक भाग (९८४८११), आणि अध्यापन (१९६) जसे बी.पी.एड. अभ्यासक्रमाचे तीन प्रमुख अंग आहे. त्यामुळे उच्चक्रमवारीत येणारे विद्यार्थ्यांचे या तिन्ही अंगांमध्ये चांगले कर्यमान हवे. तात्विक भागामध्ये मानसशास्त्र, मूल्यमापन, अध्यापन पद्धती, आरोग्य शिक्षण, सुदृढता शिक्षण, नियोजन व व्यवस्थापन अशा विविध विषयांचा समावेश असतो. प्रात्यक्षिक भागामध्ये अथलेटिक्स, फुटबॉल, हँडबॉल, बास्केटबॉल कबड्डी, खो–खो, लेझीम अशा विविध उपक्रमांचा आणि खेळाचा समावेश

असतो. तर अध्यापनामध्ये विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षणाबरोबरच मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, भूगोल विज्ञान आणि गणित यापैकी एका विषयाची निवड करून त्याचे पाठ शाळेत घ्यावे लागतात. त्यामुळे चांगल्या गुणांनी पास होण्यासाठी विद्यार्थ्यांना तात्विक, प्रात्यक्षिक आणि अध्यापन या तिन्ही अंगाचा अभ्यास, तयारी करावी लागते.

उच्च क्रमवारीमध्ये येणारे विद्‌यार्थी हे आपल्या अभ्यासाप्रती खूप मेहनत घेतात, तसेच त्या विद्‌यार्थ्यांमध्ये अभ्यासाप्रती असलेले सातत्य व आपल सर्वस्व पणाला लावून केलेला अभ्यास या कारणामुळे ते विद्‌यार्थी महाविद्यालयामध्ये उच्च क्रमवारीमध्ये येतात.

शालेय व्यवस्थापनाचा विचार केल्यास शारीरिक शिक्षण शिक्षकास विविध भूमिका पार पाडाव्या लागतात त्यामध्ये नियमित शारीरिक शिक्षण तासांचे नियोजन करणे व त्याची अंमलबजावणी करणे, आंतरशालेय स्पर्धांसाठी विविध संघांची तयारी करून घेणे आणि सहभागी होणे, शारीरिक शिक्षणाचे मूल्यमापन करणे, स्पर्धा आयोजन इ कार्य पार पाडावी लागतात. त्यामुळे बी.पी.एड. अभ्यासक्रमात उच्च क्रमवारीमध्ये आलेले विद्‌यार्थी शाळेमध्येसुद्धा उच्च अथवा चांगले कार्य करत असतील का? उच्च क्रमवारीमध्ये आलेले विद्‌यार्थी सद्य:स्थिती मध्ये काय करत आहेत? ज्या क्षेत्रात ते काम करत आहे तिथे महाविद्यालयामध्ये असताना त्यांनी जी ओळख निर्माण केली होती तीच ओळख तोच दर्जा त्यांनी त्यांच्या वास्तविक जगात अथवा त्यांच्या कार्यक्षेत्रात निर्माण केला का? अथवा टिकवून ठेवला का? या विषयावर संशोधन होणे गरजेचे आहे. म्हणून त्यांच्या सद्य:स्थितीचा आढावा घेण्यासाठी संशोधकाने चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील बी.पी.एड. अभ्यासक्रमातील उच्च क्रमवारी घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्‌यार्थी शिक्षकांचा सद्य:स्थितीचा सर्वे क्षणात्मक अभ्यास हा विषय निवडला.

## संशोधनाची कार्यपद्धती

प्रस्तुत संशोधन पूर्ण करण्यासाठी संशोधकाने सर्वेक्षणात्मक पद्धतीचा अवलंब केला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने संभाव्य पद्धतीतील हेतू पुरस्सर निदर्श पद्धतीचा उपयोग केला आहे. न्यादर्श हे संशोधन चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील बी.पी.एड. मधील उच्चक्रमवारी घेऊन उत्तीर्ण झालेल्या सन १९७७ ते २०१५ मध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमवारीत उत्तीर्ण झालेले ११४ विद्यार्थां पुरतेच मर्यादित आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने माहिती गोळा करण्याकरता प्रश्नावली या साधनाची निवड केली. प्रश्नावलीत विद्यार्थ्यांचे सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी बंदिस्त (Closed ended) व खुले (Open

ended) अशा दोन्ही प्रकारच्या प्रश्नांचा समावेश करण्यात आला होता. प्रश्नावलीत विद्यार्थ्यांचे कार्यक्षेत्र पदवी, भूषविलेली पद, अनुभव, राबविलेले उपक्रम इ विषयी प्रश्न विचारण्यात आले. गुगल फॉर्म द्वारे प्रश्नावली विद्यार्थ्यांना पाठविण्यात आली. त्यापैकी ६८ विद्यार्थ्यांनी प्रश्नावलीस प्रतिसाद दिला. त्याचे विश्लेषण करण्यासाठी शेकडाप्रमाण या संख्यासंख्याशास्त्रीय तंत्राचा उपयोग करण्यात आला.


## विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

प्रश्नावली द्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी शेकडाप्रमाण या संख्याशास्त्रीय तंत्राचा उपयोग करण्यात आला. प्रश्नावलीतील बंदिस्त प्रश्नांचे विश्लेषण पुढील भागात देण्यात आलेले आहे व त्यानंतर खुल्या स्वरूपाच्या प्रश्नांचे विश्लेषण देण्यात आलेले आहे.

**कोष्टक ४.१ :** चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील बी.पी.एड. अभ्यासक्रमातील उच्चक्रमवारी घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे कार्यक्षेत्राचे विश्लेषण

| **कार्यक्षेत्र** | **प्रतिसाद** | |
|---|---|---|
| | **वारंवारिता** | **शेकडा प्रमाणे** |
| महाविद्यालय | १६ | ४४.४% |
| शाळा | १२ | ३३.३% |
| क्लब | ०० | ००.०% |
| इतर | ०८ | २३.३ % |

१) तुम्ही सध्या कोणत्य क्षेत्रात कार्यरत आहात? What field are you currently working in?





**विद्यार्थी शिक्षकांचे कार्यक्षेत्र दर्शविणारा आलेख – ४.१**

आलेखावरून असे आढळून आले कि चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील बी.पी.एड. अभ्यासक्रमातील उच्चक्रमवारी घेऊन उत्तीर्ण झालेले ४४.४ % विद्यार्थी शिक्षक हे महाविद्यालयात कार्यरत आहेत. तर ३३.३ % विद्यार्थी शिक्षक हे शाळेमध्ये कार्यरत आहेत. तसेच २३.३ % विद्यार्थी शिक्षक हे इतर क्षेत्रात कार्यरत आहेत जसे की विद्यापीठ, साई, स्पर्धापरीक्षेचा अभ्यास, आय.टी कंपनी, इत्यादी...

**कोष्टक ४.२ : चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील बी.पी.एड अभ्यासक्रमातील उच्चक्रमवारी घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याचे पदवी शिक्षणाचे विश्लेषण**

| कार्यक्षेत्र | प्रतिसाद | |
|---|---|---|
| | वारंवारिता | शेकडा प्रमाणे |
| एम.पी.एड. | २६ | ७२.२% |
| पी.एचडी | १६ | ४४.४ % |
| बी.पी.एड. | १० | ३८.९% |
| एन.आय.एस | १० | २७.८ % |
| इतर | ०६ | १६.८ % |





**विद्यार्थी शिक्षकांचे एकून पदवी शिक्षण दर्शविणारा आलेख –४.२**

आलेखावरून असे आढळून आले कि चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील बी.पी. एड. अभ्यासक्रमातील उच्चक्रमवारी घेऊन उत्तीर्ण झालेले ७२.२ % विद्यार्थी शिक्षकांनी एम.पी. एड. हि पदवी पूर्ण केली आहे. तर ४४.४ % विद्यार्थी शिक्षकांनी पी.एच.डी. पूर्ण केली आहे. तसेच ३८.९ % विद्यार्थी शिक्षकांनी बी.पी.एड ही पदवी पूर्ण केली आहे. तसेच एन.आय.एस करणारे विद्यार्थी शिक्षक हे २७.८ % आहे. तसेच इतर पदवी जसे की एम.बीए, एम.फील, इत्यादी.. करणारे विद्यार्थी शिक्षक हे १६.८ % आहे.

**कोष्टक ४.३ : चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील बी.पी.एड अभ्यासक्रमातील उच्चक्रमवारी घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या पदाविषयीचे विश्लेषण**

| कार्यक्षेत्र | प्रतिसाद | |
|---|---|---|
| | वारंवारिता | शेकडा प्रमाणे |
| मुख्याध्यापक / उपमुख्याध्यापक | ३ | ८.३ % |
| प्राचार्य | २ | ५.५५% |
| उपप्राचार्य | ० | ०.०० % |
| विभागप्रमुख | १५ | ४१.७% |
| इतर | १६ | ४४.४४ % |

४) आपण पुढील पैकी कोणते पद भूषवित आहात का..? किंवा भूषविली आहे का? Which of the following position are you holding? Or is it decorated?




**विद्यार्थी शिक्षकांच्या कार्यक्षेत्रातील पद दर्शविणारा आलेख – ४.३**

आलेखावरून असे आढळून आले की चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील बी.पी. एड. अभ्यासक्रमातील उच्चक्रमवारी घेऊन उत्तीर्ण झालेले ८.३ % विद्यार्थी शिक्षक हे मुख्याध्यापक

/ उपमुख्याध्यापक पदावर कार्यरत आहेत. तर ५.५५ % विद्यार्थी शिक्षक हे प्राचार्य पदावर कार्यरत आहेत. तसेच ४१.७ % विद्यार्थी शिक्षक हे विभागप्रमुख या पदावर कार्यरत आहेत. तसेच ४४.४४ % विद्यार्थी शिक्षक हे इतर पदावर कार्यरत आहे. जसे की पी.टी.आय, डायरेक्टर ऑफ फिजिकल एज्युकेशन, असोसिएट प्रोफेसर,०८ कोऑर्डिनिटर, बिझनेस डेव्हलंपमेंट मॅनेजर, हेड कोच, जिम ओनर, असिस्टंट डायरेक्टर ऑफ फिजिकल एज्युकेशन, इत्यादी.....

**प्र.क्र २ तुम्ही तुमच्या क्षेत्रात काम करत असताना कोण –कोणते उपक्रम राबविले?**

वरील प्रश्नद्वारे मिळालेल्यामाहिती वरून असे आढळून आले की चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील बी.पी.एड अभ्यासक्रमातील उच्चक्रमवारी घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी शिक्षकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात पुढील प्रमाणे उपक्रम राबविले..

**शाळेमध्ये राबविलेले उपक्रम**

आंतरवर्गीय स्पर्धा, सर्व विद्यार्थ्यांचा अनिवार्य सहभाग, फुटबॉल, बॅडमिंटन, फिटनेस आणि बास्केटबॉल, हाउसनुसार इंट्राम्युरल्स, छंद सत्र ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी पर्यायांपैकी एक निवडला आणि त्यासाठी विशेष प्रशिक्षक मिळवा, समर कॅम्प, रोप स्किपिंग सेमिनार, मॅरेथॉन, स्पर्धा आयोजित केल्या, आंतरपथकीय क्रीडा महोत्सव, आंतरशालेय क्रीडा महोत्सव, शासकीय स्पर्धांचे आयोजन, सहली, ट्रेकिंग, तंबूतील शिबिरे, सुट्टीतील क्रीडा व व्यक्तिमत्व विकास शिबिरे, लेझीम पथक. बरची पथक, राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंचे प्रशिक्षण, शाळेतील सर्व मुलांच्या शारीरिक शिक्षण विषयाचे आयोजन व मूल्यमापन, वर्गात शारीरिक क्रियाशीलता विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या शैक्षणिक शिक्षणाचा त्याग न करता दररोज १० मिनिटे शारीरिक हालचाली मुलींना खेळांमध्ये सक्रिय सहभागासाठी प्रोत्साहन देण्यासाठी ही गर्ल कॅन ही आमची शाळा आधारित मोहीम आहे.

**महाविद्यालयात राबविलेले उपक्रम**

- एरोबिक्स, गणेश उत्सवातील बीएमआयची चाचणी, रिक्षाचालकांची फिटनेस चाचणी, आरोग्य आपल्या दारी, ए.आय.यू. पश्चिम क्षेत्र राष्ट्रीय हँडबॉल स्पर्धा, प्राध्यापकांसाठी क्षमता वाढ, महाराष्ट्रातील सेवारत शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम. ०६८ रिफ्रेशर कोर्सेस. प्रशिक्षण, राष्ट्रीय स्तरावरील संस्था आणि अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा आंतरराष्ट्रीय चॅम्पियनशिपमध्ये सहभागी आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये काम, हॅपी हेल्दी कॅम्पस, आउटबाउंड प्रशिक्षण, आभासी कार्यक्रम. ॲक्टिव्हिटी ब्रेक, ट्रेकिंग, एम.पी.एड. विद्यार्थ्यांसाठी इंट्राम्युरल प्रोग्राम सुरू करणे. PE शिक्षकांसाठी मासिक सुरू करणे, PE व्यावसायिकांसाठी ब्लॉग सुरू

करणे, स्ट्राइव्ह प्रोग्राम सुरू करणे, पुस्तक भिशी सुरू केली, प्रामुख्याने मुली/महिलांच्या क्रीडा सहभागावर लक्ष केंद्रित केले, कर्मचारी यांच्यासाठी योग कार्यक्रम, झोपडपट्टीतील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासात खेळ आणि व्यायामाच्या माध्यमातून हातभार लावणे, स्पर्धात्मक परीक्षा फिटनेस बॅच सुरू करणे, महिलांच्या फिटनेस बॅच सुरू करून महिलांच्या सहभागास प्रोत्साहन देणे, वारजेसाठी १ लाखांचा सूर्यनमस्कार संकल्प डिझाइन आणि स्पर्धात्मक, अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रोत्साहन दिले. निधीद्वारे उद्योजकता, मान्सून मड वीक, वुमनिएस्टा फेस्ट फक्त मुलींसाठी, सेल्फ डिफेन्स अँक्टिव्हिटी, जवळपासच्या ठिकाणांचे ट्रेक, कॉलेजमधील सर्वात योग्य मुलगा/मुलगी, राष्ट्रीय क्रीडा दिनांचे सेलिब्रेशन आणि इतर कार्यक्रम.

**निष्कर्ष:** सदर संशोधनात खालील निष्कर्ष दिसून येतात.

- चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील बी.पी.एड अभ्यासक्रमातील उच्चक्रमवारी घेऊन उत्तीर्ण झालेले जास्तीत जास्त विद्यार्थी शिक्षक हे महविद्यालयात काम करतात. त्यापेक्षा कमी शाळेत, काम करतात तर त्या पेक्षा कमी विद्यार्थी हे इतर क्षेत्रात काम करतात असे निदर्शनास आले.
- चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील बी.पी.एड. अभ्यासक्रमातील उच्चक्रमवारी घेऊन उत्तीर्ण झालेल्या जास्तीत जास्त विद्यार्थी शिक्षकांनी शारीरिक शिक्षण क्षेत्रात एम.पी. एड ही पदवी पूर्ण केली आहे. त्यापेक्षा कमी शिक्षकांनी बी.पी.एड ही पदवी पूर्ण केली. तर त्या पेक्षा कमी विद्यार्थी शिक्षकांनी एन.आय.एस ही पदवी पूर्ण केली आहे. त्या पेक्षा कमी विद्यार्थी शिक्षकांनी इतर क्षेत्रातील पदवी पूर्ण केली आहे असे निदर्शनास आले.
- चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील बी.पी.एड. अभ्यासक्रमातील उच्चक्रमवारी घेऊन उत्तीर्ण झालेले काही विद्यार्थी शिक्षक विभाग प्रमुख म्हणून पद भूषवित आहेत. काही विद्यार्थी शिक्षक मुख्याध्यापक / उपमुख्याध्यापक म्हणून पद भूषवित आहेत. काही विद्यार्थी शिक्षक प्राचार्य म्हणून पद भूषवित आहेत. तसेच शरीरिक शिक्षण क्षेत्रात वरील पदांव्यतिरिक्त इतर पदावर कार्य करणाऱ्या विद्यार्थी शिक्षकांची संख्या ही जास्त असल्याचे निदर्शनास आले.
- चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील बी.पी.एड. अभ्यासक्रमातील उच्चक्रमवारी घेऊन उत्तीर्ण झालेले जास्तीत जास्त विद्यार्थी शिक्षक शारीरिक शिक्षण क्षेत्रात काम करतांना समाधानी आहे असे निदर्शनास आले.

- चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील बी.पी.एड. अभ्यासक्रमातील उच्चक्रमवारी घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी शिक्षकांपैकी शाळेमध्ये काम करणाऱ्या विदध्यार्थ्यांच्या तुलनेत महाविद्यालयात काम करणाऱ्या विद्यार्थी शिक्षकांनी जास्तीत जास्त उपक्रम राबविले असे निदर्शनास आले.

शिफारशी

- प्रस्तुत संशोधनात माहिती मिळविण्यासाठी केवळ प्रश्नावली या साधनाचा उपयोग केला आहे. प्रश्नावली बरोबरच जर चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थी ज्या शाळेत अथवा महाविद्यालयात कार्यरत आहेत त्या शाळेतील अथवा महाविद्यालयातील प्राचार्य अथवा मुख्याध्यापकांची तसेच सहकारी शिक्षकांची मुलाखत घेतली तर अधिक चांगला अभ्यास होऊ शकेल असे संशोधकाला वाटते.
- ज्या प्रकारे उच्च क्रमवारी मिळवलेल्या विद्यार्थ्यांवर अभ्यास केला तशाच प्रकारचा अभ्यास कमी गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांच्या सद्य:स्थितीचा केल्यास परिपूर्ण अभ्यास होईल.
- प्रस्तुत संशोधनात १९७७ ते २०१५ अशा अनेक वर्षांचा अभ्यास एकत्रित केला आहे त्यामुळे संशोधनावर मर्यादा आहेत. त्या ऐवजी केवळ चार ते पाच बॅचचाच अभ्यास केल्यास अधिक संयुक्तिक ठरेल असे संशोधकास वाटते.

## संदर्भ :


ज्युलियाक्रे डे,लिंडाविर्थवेन,नेलेमॅकेल्व्हनी,रिकार्डास्टीनमायरफरफ्रंटियर्सइनसायकोलॉजी(२०१५). किशोरवयीन मुलांचे शैक्षणिक यश आणि जीवन कयाक्षन व पालकांच्या शिक्षणाची गपिका यांचा यवेक्षिक्ाृयक अश्याच अप्रकाशित.

कांगणे सो, आहेर श, महाडिक श्री, ढेंगळे दा (२०२०-२०२१) शासीरिक शिक्षण ग़ेढ/नेट पेपर २ निरालीप्रकाशन

NSPE (n.d.). Quality Physical education retrived from,http://files .eric.ed.gov/fulltest/EDS41490.PDF

Best, W .J & Khan, V. J (1996). Research in education. (7th ed.) Butler University, Emeritus,University of U illnois at Chicago. Prentic, Hall of India Private Limited New Delhi -110 001

बोरकर चं.रा.(२०१४). शारीरिक शिक्षण हस्तपुस्तिकामहाराष्ट्रराज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

कदम गणेशभानुदास (२०१२). केंद्रीयाविद्यालय पुणे ग्रेथील याध्यापरिक दिध्याथ्यांच्या शारीरिक शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोनाचा अभ्यास एम.पी.एड. अप्रकाशित.

मुलेरा. तू. आणिउमाटेवि.रा. (१९८७). शैक्षणिक संशोधनाची मुल तत्त्वे नागपूर विद्याप्रकाश.

बागवान सादिक साहिल (२०१९). पुणे शहरातील माध्यमिक शाळांमध्ये शारीरिक शिक्षणात चावणाऱ्या योग्य आणि अयोग्य चालीरितींचा अभ्यास एम.एडपदवीच्या पुर्तेसाठी पुणे विद्यापीठासाठी सादर.

कुमार, र. (२०१७). संशोधन पध्दती नवी दिल्ली : SAGE Publication, Ltd.